यशोदीप संस्था गडचिरोली द्वारा संचालित

# केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

**पदवी अभ्यासक्रम**

**(वाणिज्य विद्याशाखा)**

# माहिती पुस्तिका

**(PROSPECTUS)**

**-: सत्र :-**

**२०२०-२१**

किंमत रु. ५०/-


**महाविद्यालयाचा पत्ता** : मुल रोड, चामोर्शी
ता. चामोर्शी जि. गडचिरोली
पिन - ४४२६०३

**Website** : www.khmchamorshi.com
**E-mail** : khmchamorshi@rediffmail.com
**संपर्क** : ९४२३१२२७५०


## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

**सुचना :-** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे अधिसुचनेनुसार विद्यापीठाचे अधिकृत गीत म्हणून स्वीकृत करण्यात आले आहे. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कोणत्याही कार्यक्रामची सुरुवात विद्यापीठ गीताने होईल.

## विद्यापीठ गीत

गोंडवाना नव तपोवन आदिजन वन परिसरी ।
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी ॥ धृ ॥

स्त्रोत आदिम संस्कृतीचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्या अन् कलेतून अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांना करुनि विकसित मिळवू विद्यासागरी ॥ १ ॥

शास्त्र, वाङमय, तंत्रविद्या व्यावसायिक ज्ञानही
अर्थ वा वाणिज्य क्रीडा अन् कला विज्ञानही
नित इथे बहरेल प्रतिभा नवयुवांच्या अंतरी ॥ २ ॥

ज्ञानगंगा पुण्यपावन जीव तिजसंगे शिव
उचित संस्कारेच जगती श्रेष्ठ ठरतो मानव
उंच, उन्नत झेप घेतिल छात्र इथले अंबरी ॥ ३ ॥

दलित, पीडित, दीन, शोषित सर्व जाती बांधव
ज्ञानपीठी या निमंत्रित शिक्षणोत्सुक मानव
प्राप्त विद्येनेच मनुजा अभ्युदय या भूवरी ॥ ४ ॥

बन्धुता, स्वातंत्र्य, समता, न्यायनीतीला जपावे
विश्वशांतीस्तव नवे आव्हान हे पेलून घ्यावे
ज्ञान, अस्त्रांनीच निश्चित विजय जीवन संगरी ॥ ५ ॥

# यशोदीप संस्था गडचिरोली

नोंदणी क्र. एफ - २९७२ (गड.)

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) मान. श्री अरुण के. हरडे | - | अध्यक्ष |
| २) मान. श्री मनिष दु. समर्थ | - | उपाध्यक्ष |
| ३) मान. सौ. स्नेहा अ. हरडे | - | सचिव |
| ४) मान. श्री भुषण दु. समर्थ | - | सहसचिव |
| ५) मान. श्री प्रशांत शा. पोरेड्डीवार | - | कोषाध्यक्ष |
| ६) मान. श्री संजय मा. भांडेकर | - | सदस्य |
| ७) मान. सौ. रेश्मा विजय लांजेकर | - | सदस्या |

**केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी**

## महाविद्यालय विकास समिती

(College Development Committee)

२०१७ - २०२२

| | |
|---|---|
| १. मा. श्री अरुण. के. हरडे | - अध्यक्ष (अध्यक्ष, यशोदीप संस्था गडचिरोली) |
| २. मा. सौ. स्नेहा ए. हरडे | - सदस्य (सचिव, यशोदीप संस्था गडचिरोली) |
| ३. प्राचार्य डॉ. हिराजी पी. बनपूरकर | - सदस्य सचिव |
| ४. डॉ. महेश एम. जोशी | - सदस्य (विभाग प्रमुख, शा. शि. विभाग) |
| ५. डॉ. पवन आर. नाईक | - सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ६. प्रा. गणेश जी. दांडेकर | - सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ७. प्रा. महादेव आर. सदावर्ते | - सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ८. श्री. किशोर एम. गेडाम | - सदस्य (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) |
| ९. श्री. रमेश के. बारसागडे | - सदस्य (शैक्षणिक क्षेत्र) |
| १०. श्री. हरेश सी. गांधी | - सदस्य (औद्योगिक क्षेत्र) |
| ११. डॉ. ए. चंद्रमौली | - सदस्य (संशोधन क्षेत्र) |
| १२. श्री. किसनराव एम. शेटये | - सदस्य (सामाजिक क्षेत्र) |
| १३. डॉ. महेश एम. जोशी | - सदस्य (समन्वयक (IQAC) |
| १४. विशाल शिकारी बी.कॉम.अंत्य | - सचिव (विद्यार्थी परिषद) |
| १५. रिक्त | - (विद्यार्थी परिषदेची निवडणूक न झाल्यामुळे) |

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी



**डॉ. हिराजी बनपूरकर**
एम. ए. (मराठी), पीएच. डी.

### महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद



**डॉ. पवन आर. नाईक**
एम. कॉम., पीएच. डी .



**प्रा. गणेश जी. दांडेकर**
एम. कॉम., सेट



**प्रा. महादेव आर. सदावर्ते**
एम. कॉम., सेट, नेट



**डॉ. महेश एम. जोशी**
**एम. पी.एड., पीएच. डी .**
**(शारिरीक शिक्षण विभाग)**

### ग्रंथालय विभाग

| | |
|---|---|
| १) रिक्त | ग्रंथपाल |
| २) श्री. अविनाश के. चौधरी (बी. लिब.) | ग्रंथालय परिचर |

### शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| १) श्री किशोर एम. गेडाम (बी.ए.) | वरिष्ठ लिपीक |
| २) श्री प्रशांत व्ही. मातोरे (एम. ए., बी.एड.) | कनिष्ठ लिपीक |
| ३) श्री अमर के. खोब्रागडे (बी. ए.) | कनिष्ठ लिपीक |
| ४) श्री संतोष बी. गोपावार (बी. ए.) | शिपाई |
| ५) श्री संदिप टी. राहाटे (एस.एस.सी.) | शिपाई |
| ६) श्री चंद्रशेखर बी. कोवे (एस.एस.सी.) | शिपाई |

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी



**संवाद ... !!!**

मी स्वत:ला भाग्यशाली समजतो की, मला याद्वारे आपणाशी संवाद साधण्याची संधी लाभली आहे. गडचिरोली हा महाराष्ट्राचा पूर्वोत्तर भाग आणि छत्तीसगड, मध्यप्रदेश व तेलंगणा राज्याच्या सिमांना टेकलेला हा अतिदूर्गम जिल्हा. घनदाट जंगले व मोठ्या प्रमाणात नक्षलवाद व आदिवासीबहूल असलेला हा जिल्हा. या जिल्ह्यातील चामोर्शी हे सर्वात मोठे तालुक्याचे ठिकाण. साहजिकच शैक्षणिकदृष्ट्या चामोर्शीचे योगदान जिल्ह्यात वाखाणण्याजोगे आहे. पण या भागात आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांचे वास्तव्य जास्त आहे. सोबतच इतर राज्यातून आलेल्या शरणार्थ्यांची संख्या सुद्धा जास्त आहे. अशा भौगोलिक व सामाजिक दृष्ट्या अविकसीत भागात शैक्षणिक विकास करणे अत्यंत कठीण काम आहे.

अशा परिस्थितीत यशोदीप संस्था गडचिरोली द्वारा संचालित केवळरामजी हरडे महाविद्यालयाची स्थापना सन २०१० साली करण्यात आली. यामागील उद्देश व दृष्टिकोन अतिशय व्यापक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात, विकासाच्या प्रचंड वेगामध्ये चामोर्शी तालुक्यातील विद्यार्थी टिकला पाहीजे व त्याचे भविष्य घडल्या गेले पाहीजे याकरिता संस्थेने 'वाणिज्य' शाखा ही उच्चशिक्षणाची सोय आपणाकरिता उपलब्ध केली आहे. कारण वाणिज्य शाखेचा पदवीधर हा भविष्यात होणाऱ्या आर्थिक विकासामध्ये आपले मोलाचे योगदान देऊ शकणार आहे. 'विकास' हाच जर भारताच्या प्रगतीचा मानक असणार आहे, तर 'विकास' हा आर्थिक पाठबळाशिवाय शक्य नाही. आणि 'अर्थ' हा वाणिज्य शाखेचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे आपणास अद्यावत, निष्णात तज्ञांच्या मार्गदर्शनात व अत्यंत मैत्रीपूर्ण वातावरणात उत्तमोत्तम सुविधांसोबत 'वाणिज्य' शाखेचा पदवीधर होता यावा, याकरिता मी प्राचार्य या जबाबदारीतून आपणास उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो...!

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

* स्वयंपूर्ण, प्रशस्त इमारत व आनंददायी वातावरण.
* तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग.
* विस्तीर्ण, परिपूर्ण महाविद्यालयाचे क्रीडांगण.
* अद्यावत संगणक प्रयोगशाळा.
* अद्यावत ग्रंथसंपदा व वाचनालयाची स्वतंत्र सोय असलेला समृद्ध ग्रंथालय.
* विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक, कला, क्रीडा मंडळाची सक्रिय महाविद्यालयीन चळवळ.

### महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्टे

* ग्रामीण क्षेत्रातून व गरीब कुटूंबातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.
* विद्यार्थ्यांत सामाजिक बांधिलकी, त्याग व सेवा वृत्ती निर्माण करणे. सर्वच क्षेत्रातील योग्य ते परिवर्तन स्वीकारण्यास व आव्हांनाना तोंड देण्यास विद्यार्थ्यांत सामर्थ्य विकसित करणे.
* विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांचा शारिरीक, मानसिक व बौद्धिक विकास करुन त्यांचे व्यक्तिमत्व विकसीत करणे.
* विद्यार्थ्यांत चिकित्सक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेकाधिष्ठित व तर्कसंगत विचार-वृत्तीचा विकास करणे.
* विद्यार्थ्यांमध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, मैत्री, करुणा, सहिष्णूता या मानवी मुल्यांचे संवर्धन करणे.
* जात, पात, धर्म, पंथ, भाषा, संप्रदाय, प्रांत याऐवजी राष्ट्रनिष्ठा हिच सर्वश्रेष्ठ मानण्याची वृत्ती वृद्धिंगत करणे.
* विद्यार्थ्यांनी व्यक्तिगत व सामाजिक जीवनात नैतिकता सर्वाधिक महत्त्वाची मानावे या दिशेने त्यांचे सातत्याने प्रबोधन करणे.
* सांसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि भारतीय राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व, कायद्याचे राज्य याप्रती विद्यार्थ्यांत अतुट श्रद्धा निर्माण करणे.

### प्रवेशाबाबत माहिती

महाविद्यालयाने तयार केलेला विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांने स्वत:च्या हस्ताक्षरात भरुन योग्य त्या ठिकाणी फोटो लावून व स्वाक्षरी करुन दिलेल्या मुदतीत सादर करावा.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

खालील प्रमाणपत्राकरीता दर्शविलेले शुल्क आकारण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | बोनाफाईड सर्टिफिकेट | १०.०० |
| २) | डुप्लीकेट टी. सी. | ५०.०० |
| ३) | चारीत्र्य व जन्मतारीख प्रमाणपत्र | १०.०० |
| ४) | डुप्लीकेट ओळखपत्र | २५.०० |
| ५) | ग्रंथालय बी. टी. कार्ड (डुप्लीकेट) | १०.०० |
| ६) | शिष्यवृत्ती प्रमाणपत्र | १०.०० |

**टिप :-**

१) ईबीसी / शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना प्रवेशाचे वेळी शिक्षण शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीद्वारे कपात केली जाईल.

२) इतर परीक्षा मंडळाचे किंवा इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना रु. १००.०० आगमन शुल्क (Immigration Fee) भरावे लागेल.

३) कुठल्याही कारणाने ईबीसी/शिष्यवृत्ती अर्ज नामंजूर झाल्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

४) विद्यार्थ्यांने घटक चाचणी, प्रथम/द्वितीय सत्र परीक्षा देणे अनिवार्य ओह. अन्यथा रु. २५/- दंड आकारण्यात येईल.

५) विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे ओळखपत्र तयार करणे आवश्यक आहे. प्रवेश घेतल्यानंतर सुमारे दोन आठवड्यात ओळखपत्र तयार करुन घ्यावे.

६) महाविद्यालयात ड्रेस कोड लागू असून महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात येणे बंधनकारक आहे.

७) नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांने ठराविक वेळी वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. अन्यथा रु. १०/- दंड आकारण्यात येईल.

### ओळखपत्र

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला ओळखपत्र देण्यात येईल. वर्गात, वाचनालयात, ग्रंथालयात, महाविद्यालयातील इतर कार्यक्रमात प्रवेश घेताना व कार्यालयीन कामाकरीता विद्यार्थ्यांनी ओळखपत्र स्वत: जवळ सतत बाळगावे.

विद्यार्थ्याने ओळखपत्रातील माहितीत अनधिकृतपणे बदल करण्याचा प्रयत्न केल्यास तो गंभीर गुन्हा समजला जाईल. व त्याबद्दल सदर विद्यार्थ्याला कडक स्वरुपाची शिक्षा केली जाईल.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

**प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**

१) शाळा अगर महाविद्यालय सोडल्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत.
२) वर्ग १० वी ची मुळ गुणपत्रिका व सत्यप्रत.
३) वर्ग १२ वी ची मुळ गुणपत्रिका व सत्यप्रत.
४) वर्ग १२ वी प्रमाणपत्र (Diploma) (लागू असल्यास)
५) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ नागपूर किंवा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व्यतीरिक्त इतर मंडळ/विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) व प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) जोडावे.
६) जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत.
७) उत्पन्नाचा दाखला.
८) शिक्षणात खंड पडला असल्यास गॅप सर्टिफिकेट जोडावे.
९) आधार कार्डाची झेरॉक्स प्रत
१०) निवडणूक ओळखपत्राची झेरॉक्स प्रत

**टिप :-** विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती देणे आवश्यक आहे. व प्रमाणपत्राच्या पुरेशा सत्यप्रती स्वत: जवळ ठेवाव्यात.

### प्रवेशासंबंधी सुचना

१) शैक्षणिक पात्रता पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल.
२) दिलेल्या मुदतीत प्रवेश घेणे बंधनकारक राहील. प्रवेशीत विद्यार्थ्यांचा विद्यापीठाकडून नामांकन होईपर्यंत सदर प्रवेश तात्पुरत्या स्वरुपाचा राहील. विद्यापीठाने नामांकन नाकारल्यास सदर प्रवेश रद्द केला जाईल.
३) महाविद्यालयात प्रवेश निश्चित होताच आवश्यक सर्व शुल्क भरावे लागेल. प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी महाविद्यालय सोडून जाऊ इच्छित असेल तर त्यास सत्रातील पूर्ण फी भरावी लागेल.
४) प्रवेशाची अंतिम तारीख विद्यापीठाने ठरविल्यानुसार राहील. परंतू निर्धारित विद्यार्थी संख्या पूर्ण झाल्यास प्रवेश प्रक्रिया बंद केली जाईल.
५) विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थी प्रवेशास अपात्र ठरल्यास त्याचे शुल्क परत केले जाणार नाही.
६) प्रवेश देणे किंवा न देणे, महाविद्यालयाचे नियम मोडणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव काढून टाकणे या संबंधीचे संपूर्ण अधिकार प्राचार्यांना आहेत.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### ईबीसी / भारत सरकार शिष्यवृत्ती

१) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्यानंतर दिलेल्या मुदतीच्या आत Online शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन त्याची प्रिंट आवश्यक कागदपत्रासह महाविद्यालयात सादर करावे. व ईबीसी धारक विद्यार्थ्यांनी ईबीसी करिता लागणारे आवश्यक प्रमाणपत्र महाविद्यालयात सादर करावे.
२) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शिष्यवृत्ती मर्यादेपेक्षा जास्त असेल त्या विद्यार्थ्यांनी फ्रिशिप सवलतीचे Online अर्ज भरावे. व शिष्यवृत्ती अर्जासोबत लागणारे कागदपत्र फ्रिशिप अर्जासोबत जोडावे.

**शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) वर्ग १० वी गुणपत्रिकेची साक्षांकित सत्यप्रत.
२) मागील परीक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित सत्यप्रत.
३)शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित सत्यप्रत
४) उत्पन्नाचे मुळ प्रमाणपत्र.
५) अधिवास प्रमाणपत्र
६) आई/वडील हयात नसल्यास मृत्युचे प्रमाणपत्र जोडावे.
७) शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट जोडावे.
८) विद्यार्थ्याने यापुर्वी दुसऱ्या शाळा/महाविद्यालयातून अर्धवट अभ्यासक्रम घेतले असल्यास व सदर अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती मिळाल्याचे अथवा न मिळाल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
८) जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित सत्यप्रत.
९) वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहाचे प्रमाणपत्र जोडावे.
१०) नॉन क्रिमीलेयर लागू असलेल्या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र जोडावे.
११) आधार कार्डची सत्यप्रत
१२) राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची सत्यप्रत

**टिप:-** अभ्यासातील असमाधानकारक प्रगती, अनियमित हजेरी, गैरवर्तन, संपात भाग घेणे किंवा प्रोत्साहन करणे इ. कारणांमुळे मंजूर झालेली शिष्यवृत्ती रद्द करून ती शासनास परत केली जाईल. लबाडीने मिळविलेली शिष्यवृत्ती रद्द करून ती विद्यार्थ्यांकडून त्वरीत वसूल केली जाईल.

### विद्यापीठ परीक्षा शुल्क

विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र भरताना विद्यापीठाने निर्धारित केलेले परीक्षा शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यास भरावे लागेल. व दिलेल्या मुदतीत विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र महाविद्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### नामांकन अर्ज (Enrollment Form)

पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांने महाविद्यालयाद्धारे ऑनलाईन नामांकन अर्ज भरुन झाल्यानंतर नामांकन आवेदनपत्रातील भरलेली माहिती पडताळून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

### महाविद्यालयातील हजेरी

विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याकरीता व शासकीय सवलतीचा लाभ घेण्याकरीता प्रत्येक विषयावर झालेल्या व्याख्यानास ७५% उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही. व सवलतीपासून वंचित रहावे लागेल. परवानगीशिवाय सतत १५ दिवस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव हजेरी पटावरुन काढण्यात येईल.

### वैद्यकीय तपासणी

विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे. वैद्यकीय तपासणीत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड केला जाईल व सदर विद्यार्थ्यांची नावे विद्यापीठाकडे योग्य कार्यवाहीस पाठविण्यात येतील

### शारीरिक शिक्षण

पी. टी. करीता सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आहे. व ७५% उपस्थिती बंधनकारक आहे. काही कारणास्तव पी. टी. मध्ये भाग न घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा वार्षिक परीक्षेला बसता येणार नाही.

### क्रीडा व रंजन विभाग

शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांने क्रीडा क्षेत्रातही आपली प्रगती करावी यासाठी महाविद्यालयात विविध खेळाचे साहित्य उपलब्ध आहेत.

### ग्रंथालय व वाचनालय

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना वाचनाकरिता नियमानुसार अभ्यासाची व इतर पुस्तके मिळतील. ग्रंथालयाचे स्वतंत्र नियम ग्रंथालयात पहावयास मिळतील. ग्रंथालय सकाळी ८.३० ते दु. ३.३० पर्यंत सुरु राहील.

वाचनालयात इंग्रजी, मराठी व हिन्दी वर्तमानपत्रे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने उपयुक्त अनेक प्रकारची नियतकालीके व मासिके ठेवली जातात.

### राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना राबविली जाते. व पथकाद्धारे राष्ट्रीय कार्य केले जाते. उदा. स्वच्छता, आरोग्य, साक्षरता, पर्यावरण, अंधश्रद्धा निर्मूलन, लोकसंख्या नियंत्रण, जलसंवर्धन, आदी कार्य केले जातात. त्यामुळे इच्छूक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभाग घेऊन राष्ट्रीय कार्य करावे.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### पालकास सुचना

आपल्या पाल्याच्या सर्वांगीण प्रगतीकरीता आम्ही प्रयत्नशील आहोत. अनेकदा आपल्या पाल्याची अनियमित हजेरी, अभ्यासातील प्रगती, महाविद्यालयीन परीक्षेला न बसणे किंवा परीक्षेतील अपयश इत्यादी बाबतीत संपर्क साधणे शक्य होत नाही. त्यामुळे आपल्या पाल्याची हवी तशी प्रगती होत आहे किंवा नाही यासाठी पालकांनी अधून-मधून महाविद्यालयात येऊन पाल्याच्या प्रगतीची माहिती करुन घ्यावी व आम्हाला सहकार्य करावे.

### विद्यार्थ्यासाठी महत्त्वाच्या सुचना

१) महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपुर्वक वापरावी. हेतू पुरस्पर मालमत्तेची हानी करणे हा गुन्हा ठरेल. हानी झालेल्या मालमत्तेची भरपाई गुन्हा केलेल्या विद्यार्थ्यांकडून केली जाईल.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांशी आदरपूर्ण व सभ्यतेची वागणूक ठेवावी.

३) महत्त्वाच्या सुचनाच वर्गात वाचल्या जातील इतर सर्व सुचना फलकावर लावल्या जातील. विद्यार्थ्यांनी दररोज सुचना फलक पाहून सुचनेची माहिती करुन घ्यावी.

४) तासिका नसताना किंवा फावल्या वेळात वाचनालयात बसावे.

५) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात सभा किंवा इतर कार्यक्रम घेता येणार नाही.

६) वार्षिक परीक्षा सुरू होण्यापुर्वी १५ दिवसा अगोदर प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाची पुस्तके, फी, दंड व खेळाचे साहित्य परत करुन Clearance Certificate घेतले पाहीजे. त्याशिवाय परीक्षेचे प्रवेशपत्र मिळणार नाही.

७) विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय महाविद्यालया संबंधी कोणतीही माहिती प्रकाशनार्थ वर्तमानपत्रात देऊ नये. यासंबंधी कडक कार्यवाही करण्यात येईल.

### विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम

१) महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालय परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, धुम्रपान व मद्यपान करणे किंवा करून येणे कायद्याने गुन्हा आहे. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

२) महाविद्यालयाच्या परिसरात रॅगींग घेणे गुन्हा आहे. तसे आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल.

३) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी वर्गात मोबाईल, कॅमेरा सोबत आणू नये.

४) विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अशैक्षणिक चळवळीत, विध्वंसक कृतीत भाग घेऊ नये.

५) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात कोणत्याही प्रकारच्या संघटना व मंडळे स्थापन करता येणार नाही.

६) महाविद्यालयातील विविध कार्यक्रम, स्वातंत्र्य दिन व गणराज्य दिन यासारख्या राष्ट्रीय उत्सव प्रसंगी सर्वांची उपस्थिती अनिवार्य आहे.

७) महाविद्यालयात विवादात्मक प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबत प्राचार्यांचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

## ::प्रवेश::

महाविद्यालयात खालील अभ्यासक्रमास प्रवेश दिला जाईल.

### वाणिज्य विद्याशाखा

**B. Com. Sem I (CBCS Pattern)**

**विषय :-**

1) English
2) Marathi
3) Business Economics-I
4) Principal of Management-I
5) Financial Accounting-I
6) Statistics Techniques & Business Mathematics-I

**Optional Group**

1) Basic Marketing Management
2) Human Resource Management
3) Principle of Banking & Insuran.
4) Computer Fundamental

**B. Com. Sem II (CBCS Pattern)**

**विषय :-**

1) English
2) Marathi
3) Business Economics-II
4) Principal of Management-II
5) Financial Accounting-II
6) Statistics Techniques & Business Mathematics-II

**Optional Group**

1) Basic Marketing Management
2) Human Resource Management
3) Principle of Banking & Insurance
4) Computer Fundamental

**B. Com. Sem III (CBCS Pattern)**

**विषय :-**

1) English-III
2) Marathi-III
3) Company Law
4) Monetary Economics-I
5) Corporate Accounting-I
6) Cost Accounting

**Optional Group**

1) Advertising Management
2) Organization Behavior-I
3) Banking & Insurance Law & Practices-I
4) Information Technology Office Automation

**B. Com. Sem IV (CBCS Pattern)**

**विषय :-**

1) English-IV
2) Marathi-IV
3) Company Law
4) Monetary Economics-II
5) Corporate Accounting-II
6) Cost Accounting

**Optional Group**

1) Advertising Management
2) Organization Behavior-II
3) Banking & Insurance Law & Practices-II
4) Information Technology Office Automation

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

**B. Com. Sem V (Semester Pattern)**

**विषय :-**

1) Auditing
2) Indian Economics
3) Advance Accounting-I
4) Business Communication-I
5) Commercial Law

**Optional Group**

1) Marketing Management (Industrial Marketing)
2) Human Resource Management (Industrial.Relations)
3) Banking & Insurance (Recent Trends in Banking & Insurance-I)
4) Information Technology (Computerized Accounting & MIS)

**B. Com. Sem VI (Semester Pattern)**

**विषय :-**

1) Income Tax
2) International Economics
3) Advance Accounting-II
4) Business Communication-II
5) Corporate Law

**Optional Group**

1) Marketing Management (Service Marketing)
2) Human Resource Management (Labour Law)
3) Banking & Insurance (Recent Trends in Banking & Insurance-II)
4) Information Technology (Web Design & Software Maintenance)

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### महाविद्यालयीन व विद्यापीठ शुल्क

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या अधिसुचनेनुसार शैक्षणिक सत्र २०२०-२१ करिता विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार महाविद्यालयीन व विद्यापीठ शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १. | प्रवेश शुल्क | २५.०० |
| २. | ओळख पत्र | २५.०० |
| ३. | ग्रंथालय शुल्क | १००.०० |
| ४. | क्रीडा व व्यायामशाळा शुल्क | १२०.०० |
| ५. | वैद्यकीय तपासणी शुल्क | २०.०० |
| ६. | शारिरीक क्षमता चाचणी शुल्क | ३०.०० |
| ७. | महा. वार्षिकांक शुल्क | १००.०० |
| ८. | अभ्यासेत्तर कार्यक्रम शुल्क | ४०.०० |
| ९. | अति. अभ्यासेत्तर कार्यक्रम शुल्क | ८०.०० |
| १०. | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | ४०.०० |
| ११. | माहिती पुस्तिका शुल्क | ५०.०० |
| १२. | विद्यापीठ वार्षिक शुल्क | १२५.०० |
| १३. | विद्यार्थी कल्याण निधी | ३५.०० |
| १४. | विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी | ५.०० |
| १५. | विद्यार्थी सहायता निधी | ५.०० |
| १६. | विद्यापीठ क्रीडा व सांस्कृतिक शुल्क | २५.०० |
| १७. | विद्यार्थी संघ शुल्क | ५.०० |
| १८. | वैद्य. तपासणी अर्ज शुल्क | ५.०० |
| १९. | नामांकन अर्ज शुल्क (प्रथम वर्षाकरीता) | १०.०० |
| २०. | नामांकन शुल्क (प्रथम वर्षाकरीता) | १२५.०० |
| २१. | अश्वमेध शुल्क | ३०.०० |
| २२. | ई-सुविधा शुल्क | ५०.०० |
| २३. | पर्यावरण शुल्क (द्वितीय वर्षाकरीता) | १५०.०० |
| २४. | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १०.०० |
| २५. | रासेयो स्वयंनिर्वाहक एकक शुल्क | १०.०० |
| **२६.** | **शिक्षण शुल्क** | **८००.००** |
| | **एकूण शुल्क** | **२०२०.००** |

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### ● सार्वजनिक सुट्या ●

**सन २०२०**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली च्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील सर्व कार्यालये व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सन २०२० या वर्षाकरीता खालीलप्रमाणे सुट्या जाहिर करण्यात आल्या आहेत.

**अ) सार्वजनिक सुट्या :**

| अ.क्र. | सुटीचे दिवस | वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | रविवार | २६ जानेवारी २०२० |
| २. | छ. शिवाजी महाराज जयंती | बुधवार | १९ फेब्रुवारी २०२० |
| ३. | महाशिवरात्री | शुक्रवार | २१ फेब्रुवारी २०२० |
| ४. | होळी (दुसरा दिवस) | मंगळवार | १० मार्च २०२० |
| ५. | गुढीपाडवा | बुधवार | २५ मार्च २०२० |
| ६. | रामनवमी | गुरुवार | २ एप्रिल २०२० |
| ७. | महावीर जयंती | सोमवार | ६ एप्रिल २०२० |
| ८. | गुड फ्रायडे | शुक्रवार | १० एप्रिल २०२० |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | मंगळवार | १४ एप्रिल २०२० |
| १०. | महाराष्ट्र दिन | शुक्रवार | १ मे २०२० |
| ११. | बुद्ध पौर्णिमा | गुरुवार | ७ मे २०२० |
| १२. | रमझान ईद | सोमवार | २५ मे २०२० |
| १३. | बकरी ईद | शनिवार | १ ऑगस्ट २०२० |
| १४. | स्वातंत्र्य दिन | शनिवार | १५ ऑगस्ट २०२० |
| १५. | पारशी नववर्ष दिन | रविवार | १६ ऑगस्ट २०२० |
| १६. | गणेश चतुर्थी | शनिवार | २२ ऑगस्ट २०२० |
| १७. | मोहरम | रविवार | ३० ऑगस्ट २०२० |
| १८. | महात्मा गांधी जयंती | शुक्रवार | २ ऑक्टोबर २०२० |
| १९. | दसरा | रविवार | २५ ऑक्टोबर २०२० |
| २०. | ईद-ए-मिलाद | शुक्रवार | ३० ऑक्टोबर २०२० |
| २१. | दिवाळी (लक्ष्मीपुजन) | शनिवार | १४ नोव्हेंबर २०२० |
| २२. | दिवाळी (बलीप्रतीपदा) | सोमवार | १६ नोव्हेंबर २०२० |
| २३. | गुरुनानक जयंती | सोमवार | ३० नोव्हेंबर २०२० |
| २४. | ख्रिसमस | शुक्रवार | २५ डिसेंबर २०२० |

**ब) स्थानिक सुट्या:**

**२०२० या वर्षाकरीता मा. जिल्हाधिकारी हे ज्या स्थानिक सुट्या जाहिर करतील, त्या सुट्या वेळोवेळी जाहिर करण्यात येतील.**

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### Gondwana University
### ACADEMIC CALENDAR 2020 - 2021

**1. Terms & Vacation**

| | |
|---|---|
| First Term | :01.08.2020 to 28.02.2021 |
| Diwali Holidays | :13.11.2020 to 22.11.2020 |
| Preparatory break | :01.03.2021 to 07.03.2021 |

**Conduct of Examination Form : 08.03.2021**

| | |
|---|---|
| Semester break (Vacation) | :27.03.2021 to 04.04.2021 |
| Second Term | :05.04.2021 to 21.08.2021 |
| Preparatory break | :01.08.2021 to 08.08.2021 |

**Conduct of Examination Form : 09.08.2021**

Semester break (Vacation) :22.08.2021 to 29.08.2021

**2. Admissions**

a) Last Date of Admission : 30.11. 2020

b) Last Date for Admission with prior permission of the Vice-Chancellor : 15.12. 2020

**3. Last Date of Submission of Enrollment** Forms to the University **: 10.12.2020** for admission upto 30.11.2020
: **20.12.2020** for admission upto 15.12.2020

**4. Examination**

a) Odd Semester

1. Commencement of Exam. **: 08.03.2021**

2. Last Date for receipt of exams forms

a) Regular Students : 15.01.2021

b) Old Ex-Students : 15.01.2021

c) Ex-Students of immediately : 15.01.2021

**5. Examination**

**Even Semester**

**Commencement of Examination: 09.08.2021**

Last Date for receipt of exams forms

a) Regular Students : 30.06.2021

b) Old Ex-Students : 30.06.2021

c) Ex-Students of : 30.06.2021

**6. Declaration of Result: As per provisions of Maharashtra Public Universities Act, 2016**

## केवळरामजी हरडे महाविद्यालय चामोर्शी

### ACADEMIC CALENDAR 2020 - 2021

| Sr. No. | Month | Programs |
|---|---|---|
| 1 | June | Distribution of prospectus & Admission process starts for new session. CDC, IQAC Meeting & formation of various college committee, Preparation of time table |
| 2 | July | Regular classes commences from 1st July. Bridge course for students. Tree Plantation, Awareness & Meditation & fitness program & Competitive Exam Guidance program, Alumni & Parents meeting, Blood Donation Program |
| 3 | August | Enrolment of value added course, Class Tests, Field visits, Remedial Classes. |
| 4 | September | Remedial Classes, Inter class seminar, NSS program, Inter collegiate sports competitions, Game Training Camps, Gust Lecture, Subject wise paper presentation, Role play, Group discussion, Quiz competition. |
| 5 | October | College preliminary Examination, winter vacation, if required extra classes will be taken. |
| 6 | November | Winter vacation, Regular classes will starts after vacations |
| 7 | December | NSS program, Medical Examination of students, Book exhibition |
| 8 | January | Annual Cultural & Sports event, Alumni meeting, Parent Teacher meeting & held various competitions, NSS Special Camp |
| 9 | February | Inter class seminar, Gust Lecture, Remedial Classes, Subject wise paper presentation, Role play, Group discussion, Quiz competition, Revision & Preliminary Examination, One day picnic |
| 10 | March | Remedial Classes, Revision & Preliminary Examination, Send-off |
| 11 | April | University Examination |
| 12 | May | Summer Vacation |